SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

## INTERNAL COMPLAINT COMMITTEE

**ACADEMIC YEAR- 2022 – 2023**

**"WORKSHOP" ON महिला सबलीकरण व सक्षमीकरण आणि बौद्धिक संपदा हक्क (IPR)**

**03/04/2023**

---

# Report

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. ३ एप्रिल २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य विधी, सेवा प्राधिकरण मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणा, बुलढाणा जिल्हा वकील संघ, मोताळा तालुका वकील संघ द्वारा आयोजित " महिला सबलीकरण व बौद्धिक संपदा हक्क" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर होते. प्रमुख पाहुणे व उद्घाटक मा. श्री. स्वप्नील खटी प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश बुलढाणा, मा. श्री. राजेंद्र मेहरे जिल्हा न्यायाधीश बुलढाणा तसेच मा. श्री. हेमंत भुरे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मा. श्री. एस. पी. पांडव दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मोताळा, मा. श्री. पी . बी तेलगोटे अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बुलढाणा, मा. श्रीमती पी. ए. खंडारे अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बुलढाणा, मा. ॲड. विजय सावळे अध्यक्ष बुलढाणा जिल्हा वकील संघ बुलढाणा, मा. ॲड. मनीष शर्मा अध्यक्ष, मोताळा तालुका वकील संघ मोताळा यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली होती.

कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक मा. श्री. स्वप्नील खटी प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश बुलढाणा यांनी 'बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर मार्गदर्शन करताना बौद्धिक संपदा म्हणजे काय ? बौद्धिक संपदा अधिकार, बौद्धिक संपदा कायदे जसे की पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क, डिजाइन, भौगोलिक निर्देशांक याबाबतच्या प्रक्रिया, कायदेशीर तरतुदी, केस स्टडी याविषयी सखोल मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवून नवनिर्मिती केली पाहिजे.

मा. श्री. राजेंद्र मेहरे जिल्हा न्यायाधीश बुलढाणा यांनी महिला अत्याचाराचे वाढते प्रमाण व त्यासंबंधीचे कायदे या विषयावर मार्गदर्शन केले. मा. ॲड. विजय सावळे व मा. ॲड. मनीष शर्मा यांनी महिला सुरक्षाविषयक कायदेयांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये संपूर्ण भर हा संशोधन आणि अभिनव कल्पना यावर दिलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिक प्रमाणात संशोधनाकडे वळले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. चित्रा मोरे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. सौ. नंदा मास्कर यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन महिला तक्रार निवारण समिती (ICC) व IQAC अंतर्गत करण्यात आले होते.









दैनिक **आपला गुजरात** मंगळवार दिनांक ४ एप्रिल २०२३ **बुलडाणा जिल्हा वृत्तविशेष**

# बौद्धिक संपदा हक्काचे ज्ञान-न्यायाधीश खटी

## श्री शिवाजी महाविद्यालयात महिला सबलीकरण, सक्षमीकरण व बौद्धिक सपंदा हक्क विषयावर ऐतिहासिक कार्यशाळा संपन्न

मोताळा (प्रतिनिधी):-
बौद्धिक संपदा हक्काचे ज्ञान असल्याचे महत्वपूर्ण प्रतिपादन स्वप्नील चंद्रकांत खटी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बुलडाणा यांनी आज सोमवार दिनांक ३ एप्रिल २०२३ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुबंई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलडाणा, बुलडाणा जिल्हा वकील संघ, मोताळा तालुका वकील संघ तथा श्री शिवाजी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय मोताळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत महिला सबलीकरण, सक्षमीकरण व बौद्धिक सपंदा हक्क या विषयावर ऐतिहासिक कार्यशाळेत प्रमुख पाहुणे तथा उद्घाटक म्हणुन स्वप्नील चंद्रकांत खटी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बुलथणा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. यावेळी बोलतांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश स्वप्नील चंद्रकांत खटी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना महिला सबलीकरण,सक्षमीकरण व बौद्धिक सपंदा हक्क विषया बाबत सखोल माहिती देऊन अमूल्य असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गजानन जाधव होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून राजेंद्र. एन. मेहरे जिल्हा न्यायाधीश -१ बुलडाणा, हेमंत. एस.भुरे सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलडाणा तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, एस.पी.पांडव दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर मोताळा,पी.पी.तेलगोटे अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर बुलडाणा, श्रीमती पी.ए.खंडारे अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर बुलडाणा, अँड विजय सावळे अध्यक्ष बुलडाणा जिल्हा वकील संघ, अँड मनीष शर्मा अध्यक्ष मोताळा तालुका वकील संघ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. आपले व्यस्त वेळापत्रक असतांना सुद्धा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महिला सबलीकरण, सक्षमीकरण व बौद्धिक सपंदा हक्क या बाबचे कायदेशीर ज्ञान असावे या करीता श्री शिवाजी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने आयोजीत कार्यशाळेत उपस्थित मान्यवरांनी बौद्धिक संपदा म्हणजे काय, बौद्धिक संपदा अधिकार, बौद्धिक संपदा कायदे जसे की, पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क, डिजाइन, भौगोलिक निर्देशांक याबाबतच्या प्रक्रिया, कायदेशीर तरतुदी केस स्टडी या विषयी सखोल मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ जाधव सर यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संपूर्ण भर हा संशोधन आणि अभिनव कल्पना यावर दिलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिक प्रमाणात संशोधनाकडे वळायला हवे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ जाधव सर यांनी आपल्या अध्यक्ष स्थानावरून बोलतांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.चित्रा मोरे, तर आभार प्रदर्शन प्रा. नंदा मास्कर यांनी मानले कार्यक्रमाला पत्रकार, पोलीस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.